# अदानी इलेक्ट्रिसिटीकडून मुंबईतील ग्राहकांसाठी हरित ऊर्जा सुविधा

**मुंबई** – मुंबईची सर्वात मोठी वीज वितरण कंपनी अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड (एईएमएल) मुंबईच्या हरित ऊर्जा परिवर्तनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहे. सर्व ग्राहकांना अपारंपरिक ऊर्जेसाठी त्यांचे लक्ष्य ठरवण्याचे स्वातंत्र्य एईएमएल सादर करत असलेल्या मुंबई हरित ऊर्जा उपक्रमामुळे (ग्रीन एनर्जी इनिशिएटिव्ह) मिळणार आहे. एमईआरसीकडून अगोदरच मान्य करण्यात आलेल्या प्रस्तावाच्या माध्यमातून ही क्षमता ५० टक्क्यांपर्यंत वाढवण्यात येणार आहे. त्यासाठी १,००० मेगावॅट ऊर्जा खरेदीचा प्रस्ताव एमईआरसी ला सादर करण्यात आला आहे.